# अध्ययन शैली
# Learning Style

- The term learning style  speaks of the understanding that every student learns differently .Technically an individual learning style refers to the prefrential way in which the students absorb,process,comprehend and retain information.
- अध्ययन शैली म्हणजे,प्रत्येक अध्ययन कर्ता अध्ययनासाठी वेगवेगळ्या मार्गाचा वापर करतो.त्यापैकी ज्या मार्गाने त्याला माहितीचे आकलन चांगल्या प्रकारे होते,तो अध्ययनाचा मार्ग किवा पद्धती म्हणजे अध्ययन शैली होय.

# अध्ययन शैली चे प्रकार

- दृक अध्ययन शैली (Visual Learning style)
- श्राव्य अध्ययन शैली ( Audio Learning style)
- कारक अध्ययन शैली ( kinestheticLearning style)

- **दृक किंवा आकृतीरूप अध्ययन शैली**
- ज्या विद्यार्थ्यांना दृक किंवा आकृतीरूप माध्यमातून सांगितलेल्या गोष्टीचे चांगले आकलन होते, त्या विद्यार्थ्यांची अध्ययन शैली ही दृक या प्रकारची असते.

- **दृक अध्ययन शैलीचे दोन प्रकार पडतात**
- वाचन आणि लेखन या दृक स्वरूपाचा क्षमतांचा उपयोग करणारे अध्ययन कर्ते

- चार्ट , व्हिडिओ आणि प्रत्यक्ष दिग्दर्शन या दृक स्वरूपाच्या माध्यमांचा उपयोग करणारे अध्ययन कर्ते

- श्राव्य स्वरुपाची अध्ययन शैली

- ज्या विद्यार्थ्यांना श्राव्य माध्यमातून (ऐकण्यातून वा बोलण्यातून) सांगितलेल्या गोष्टीचे  चांगले आकलन होते,त्या विद्यार्थ्यांची अध्ययन शैली श्राव्य स्वरुपाची असते.

- कारक /कृती स्वरुपाची अध्ययन शैली

- ज्या अध्ययन  कार्याला प्रत्यक्ष कारक कृतीच्या द्वारे एखद्या गोष्टीचे  चांगले आकलन होते,त्यांची अध्ययन शैली हि कारक प्रकारची असते.
- या प्रकारची अध्ययन शैली असणारे विद्यार्थी ‘Learning by doing’ या तत्वा प्रमाणे शिकतात .

- वरील तीन स्वरूपाची अध्ययन शैली बाबत असे म्हणता येईल की या तीनही शैली प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये असतात. पण एखाद्या शैलीचा वापर इतर दोन शैलीपेक्षा प्रभावीपणे करता येत असल्यामुळे त्या विद्यार्थ्यांची ही प्रमुख अध्ययन शैली बनते.

- VARK Model of student learning by Neil Flaming-2006

- V- visual
- A- auditory
- R-Reading/ writing Preference
- K- Kinesthetic

- या मॉडेल द्वारे नील फ्लेमिंग यांनी विद्यार्थ्यांची माहिती संपादन करण्यासाठी वेगवेगळ्या अध्ययन शैली चा वापर केला. याद्वारे फ्लेमिंग ची असे म्हणणे होते की,

- विद्यार्थ्यां च्या अध्ययन शैली चा त्यांच्या वर्तनावर व अध्ययनावर सार्थ फरक पडतो.
- विद्यार्थ्यांनी निवडलेल्या अध्ययन शैली व अध्ययन कार्यनिती यांच्यात साम्य असले पाहिजे .

- विद्यार्थ्यांच्या अध्ययन शैली नुसार माहितीचे सादरीकरण केल्यास विद्यार्थ्यांच्या आकलन क्षमतेत , संपादन प्रेरणे मध्ये आणि बोधात्मक क्षमतेच्या  पातळीत वाढ होते. म्हणून शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या अध्ययन शैली नुसार अध्यापनाचे नियोजन व अध्ययन अनुभवांची मांडणी व निवड केली   पाहिजे.

# उपयोजन

- **दृक अध्ययन शैली साठी कार्यनिती**:

- १. आकृत्या, चार्ट, आलेख यांचा अध्यापन अध्ययनासाठी जास्तीत जास्त वापर करावा .
- २. महत्त्वांच्या संकल्पना विविध रंगांनी अधोरेखित कराव्यात .
- ३. लेखन व वाचन करताना महत्त्वाच्या शब्दाचा योग्य चिन्ह आणि आद्य  अक्षराने ओळखावे.

- **श्राव्य अध्ययन शैली नुसार कार्यनीती :**

- १. अध्ययन सामग्री चे रेकॉर्डिंग करून ऐकावे.
- २. विद्यार्थ्यांना एखाद्या विषयावर आपले मत सर्वांसमोर मांडायला प्रवृत्त करावे.
- ३. आपल्या मित्रांसोबत चर्चा करण्यास सांगावे.
- ४. आपला स्वाध्याय, पुस्तकातील माहिती मोठ्या मोठ्याने वाचण्यास सांगावे.

- **कारक कृती नुसार कार्यनिती**
- १. प्रत्यक्ष जीवनातील उदाहरणाचा वापर अध्ययन अध्यापनात करावा.
- २. अमूर्त पातळीवरील संकल्पनांना मूर्त स्वरुपात समजून सांगण्यासाठी केस स्टडी सारख्या पद्धतींचा वापर करावा.
- ३. प्रोजेक्ट व प्रायोगिक पद्धतींचा वापर करावा.
- ४. आपल्या कल्पनांना मूर्त स्वरूप देण्यासाठी चित्रे फोटो यांचा वापर करावा .
- अशाप्रकारे अध्ययन शैली नुसार योग्य अध्ययन अध्यापन कार्य निधीचा वापर केल्यास विद्यार्थ्यांना विषयाचे आकलन चांगले होईल.

# बहुसांस्कृतिक वाद



Sara
SARA

- Multiculturalism is to describe one way of Approaching cultural diversity within a society.
- बहुसांस्कृतिकवाद मध्ये वांशिक ,भाषिक,धार्मिक,सांकृतिक,जातीय,प्रांतीय व भौगोलिक विविधता असणाऱ्या सर्वांनी एकत्र शांततेने जगण्याचा विचार करणारा एक आधुनिक विचार प्रवाह आहे .

- बहुसांस्कृतिक समाज आज या संकल्पनेचा प्रसार विसाव्या शतकात म्हणजे जवळपास 1970 च्या सुमारास झाला.
- जर्मनी येथील समाजशास्त्र विषयाचे प्राध्यापक यांनी बहुसांस्कृतिक वादामुळे समाज जीवनावर खालील परिणाम होतो असे सांगितले आहे.

- 1. बहुसांस्कृतिक समाजामध्ये सामाजिक परिवर्तन घडून येते: सांस्कृतिक विविधतेमुळे लोकांच्या नैतिक व सांस्कृतिक जीवनावर प्रभाव पडतो.
- 2. आदर्श आत्मक व बोधात्मक बदल: वेगवेगळ्या देशात स्थायिक झालेले लोक तेथील जीवन पद्धतीचा स्वीकार करतात.
- 3. अभिवृत्ती: बहुसांस्कृतिक समाजामध्ये व्यक्तीच्या वर्तनात मित्रत्वाची व एकमेकांना मदत करण्याची भावना विकसित होतो. त्यांच्यामध्ये उदारमतवादी व लोकशाही व्यक्तींचा विकास होतो. तो

- संस्कृतीची संकल्पना:

- बहुसांस्कृतिक समाजात विविध संस्कृतीचे लोक एकत्र जीवन जगतात त्यामुळे विविध संस्कृतीच्या प्रभावामुळे जुन्या प्रथा परंपरांचा त्याग करून नवीन गोष्टींचा स्वीकार केला जातो.

- बहुसांस्कृतिक समाज यात विविध संस्कृतीच्या लोकांनी एकत्र येऊन शांततामय मार्गाने जीवन जगण्याच्या पद्धती वर जरी विश्वास असला तरी ज्या संस्कृतीच्या लोकांचे प्रमाण अधिक असते किंवा जो समुदाय आर्थिक दृष्ट्या सक्षम असतो तो खालच्या समुदायावर वर्चस्व गाजविण्याचा प्रयत्न करते आणि त्यामुळे क्लाश ऑफ सिविलिझेशन किंवा वार ऑफ कल्चर निर्माण होण्याची शक्यता असते. म्हणूनच विद्यार्थ्यांमध्ये बहुसांस्कृतिक समाजाचा व्यक्तीवर होणाऱ्या प्रभावाचे ज्ञान असणे आवश्यक आहे.


UNITED WE STAND


INDIA



- भारतातील सांस्कृतिक विविधता:

- १.आर्थिक भिन्नता
- २. जाती भिन्नता
- ३.ग्रामीण व शहरी भागातील भिन्नता
- ४. भाषिक भिन्नता
- ५. सांस्कृतिक भिन्नता
- ६. धार्मिक भिन्नता
- ७. भौगोलिक भिन्नता

- बहुसांस्कृतिक शिक्षणाचा अर्थ:

- Multiculturalism education is a field of study and and in emerging discipline was the major in is to create a equal educational opportunities for students from diverse racial, ethinic, social class and cultural group. its major goal is to help All students to acquire the knowledge, attitude And skills needed to function effectively in the pluralistic democratic society and to interact, negotiate and communicate with the people from diverse groups in order to create a Civic and moral community that was for the common good.
- VK Jagannath( 2004)

- बहुसांस्कृतिक शिक्षण ही वैयक्तिक विकासाची अशी प्रक्रिया आहे की ज्यामध्ये विविध धर्म, भाषा, वंशी, संस्कृती असलेल्या व्यक्तींना एकमेकांसोबत जीवन जगण्याची कला शिकविली  जाते.

- बहुसांस्कृतिक शिक्षणाचे घटक:

- १. अल्पसंख्यांक आणि स्त्रिया यांचा  अभ्यास
- २. द्विभाषिक कार्यक्रमाचा विकास व आयोजन
- ३. सांस्कृतिक जाणीव जागृती
- ४.  परस्पर मानवी संबंधाची जोपासणा
- ५. मूल्यांची स्पष्टता

# बहुसांस्कृतिक शिक्षणाच्या  मिती:

- जे.के बॅग्स  यांनी बहुसांस्कृतिक शिक्षणाच्या पाच मी ती सांगितले आहे.
- आशयाचे एकात्मीकरण(Content Integration): यामध्ये विविध संस्कृतीचा अभ्यास करण्यासाठी त्यांच्या संकल्पना,  मूल्य यांची एकात्मिक स्वरूपात मांडणी करून शिकवावे.
- ज्ञानाची संरचना(Knowledge Construction): विविध सांस्कृतिक भिन्नता लक्षात घेऊन त्याप्रमाणे ज्ञानाची रचना करावी. ही करताना मानवाला समाज समाजात जीवन जगताना येणाऱ्या विविध अनुभवांवर  ती आधारित असावी.

- समानता निर्माण करणे(Equity Pedagogy): शिक्षकांनी सांस्कृतिक विविधता लक्षात घेऊन विविध अध्यापन पद्धतींचा वापर करावा. जेणेकरून प्रत्येक विद्यार्थ्यांना शैक्षणिक संपादनात निश्चित पातळी गाठता येईल.
- पूर्वग्रह दूर करणे(Minimize The Prejudice): विद्यार्थ्यांच्या  विभिन्न जाती, वन शान प्रती असलेल्या पूर्वाग्रह  काढून टाकता आला पाहिजे. जेणेकरून या सर्वां प्रति त्यांच्यामध्ये सहिष्णुता निर्माण होऊन, त्यांची सर्व धर्म, जात, वंश, भाषा यांना समजून घेण्याची मानसिक स्थिती निर्माण होईल.

- शालेय वातावरण(Empowring School Environent) : शालेय वातावरणामध्ये अशा प्रकारचे बदल करावेत, जेणेकरून वरील चारही घटक यशस्वीपणे पूर्ण करून विद्यार्थ्यांमध्ये बहुसांस्कृतिक समाजाबद्दल सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होईल.



# बहुसांस्कृतिक वर्गात शिक्षकाची भूमिका
# Role of Teacher In Multicultural Classroom

- बहुसांस्कृतिकतेबद्दल सकारात्मक ज्ञान. मुल्ये व कौशल्य याची जाणीव वर्ग अध्यापन आतून शिक्षकाला करून देता येते. शिक्षकांनी वर्गात दिलेल्या विविध संस्कृती,धर्म ,वंश, जात इत्यादी बद्दल आदर प्राप्त होतो.
- शिक्षकांनी वर्गातील प्रत्येक विद्यार्थ्याला त्याची स्वतःच्या ची जात,धर्म,वंश यापेक्षा इतर जात, धर्म, वंश, संस्कृतीचा अभ्यास करण्यासाठी प्रेरित केल्यास प्रत्येक विद्यार्थी आपल्या विचारांचे आदान-प्रदान, मुक्तपणे एकमेकांशी करतील व एकमेकांच्या भावना समजून घेण्याचा प्रयत्न करतील.

शिक्षकांनी बहुसांस्कृतिक शिक्षणाची उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी खालील प्रकारे अध्ययन-अध्यापन प्रक्रियेचा अवलंब करावा.

- १. विविध सांस्कृतिक पार्श्वभूमी असणाऱ्या विद्यार्थ्यांचा अध्ययन अध्यापनात सक्रीय सहभाग घ्यावा.
- २. शिक्षकांनी सर्व अध्ययन शैली चा वापर करून विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्तेला चालना द्यावी.
- ३. शिक्षकांनी अध्ययन अध्यापनातील उपक्रमांचे नियोजन सांस्कृतिक विभिन्नता लक्षात घेऊन करावी.

- ४. शिक्षकांनी सांस्कृतिक विविधतेने नुसार विद्यार्थ्यांचे गट पाडून शिकवावे. जेणेकरून गटांमधील विद्यार्थी आपापसात मूल्य , ज्ञान, कौशल्ये इतरांसोबत विचारांची देवाण-घेवाण करतील.
- ५. शिक्षकांनी समाजातील विविध धर्म ,जाती, वंशाचे वक्ते, नेते यांना बोलून त्यांच्या तर्फे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे.
- ६. शिक्षकांनी सर्व जाती धर्म वंशाच्या विद्यार्थ्यांचे विद्यार्थ्यांचे प्रति समान दृष्टिकोन ठेवावा